# विपश्यना

साधकों का
मासिक प्रेरणा पत्र

**बुद्धवर्ष २५५६, फाल्गुन पौर्णिमा, २७ मार्च, २०१३ वर्ष २ अंक १**

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः– http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

**धम्मवाणी**

**मोघा जाति च वण्णो च, सीलमेव किरुत्तमं।**
**सीलेन अनुपेतस्स, सुतेनत्थो न विज्जति॥**
**खत्तियो च अधम्मट्ठो, वेस्सो चाधम्मनिस्सितो।**
**ते परिच्चज्जुभो लोके, उपपज्जन्ति दुग्गतिं॥**

*जातक-अट्ठकथा-३६२, सीलवीमंसजातकवण्णना- ६६-६७.*

जाती आणि वर्ण व्यर्थ आहेत, शीलच श्रेष्ठ आहे. जो शीलांपासून दूर आहे, त्याच्या बहुश्रुत असण्याला काहीही अर्थ नाही. अधार्मिक क्षत्रिय असो; अथवा अधार्मिक वैश्य असो, ते [देव-लोक व मनुष्य-लोक] दोन्ही लोकांना सोडून, दुर्गतीला प्राप्त होतात.

## भगवानांच्या मार्गात

## जाती-भेद नव्हता

भगवान बुद्धांच्या शतकांपूर्वी पासूनच देशात जाती-पातीमुळे अंधकार पसरलेला होता. नीच कुळात जन्म घेतल्यामुळे अथवा हीन कर्म केल्यामुळे व्यक्तीला हीन मानले जात होते.

व्यवसाय, कर्म आणि जातींच्या उच्च आणि नीच, हीन व श्रेष्ठ वेगवेगळ्या श्रेण्या होत्या–

(१) शूद्र

(२) चांडाळ

(३) भंगी

(४) चांभार

ह्या नीच जाती मानल्या जात होत्या.

(१) ब्राम्हण

(२. क्षत्रिय

३. वैश्य

ह्या उच्च जाती मानल्या जात होत्या.

ह्याच प्रकारे ब्राम्हणांचे गोत्रही हीन आणि उच्च होते–

**हीन गोत्र–**

१. कोसिय गोत्र

२. भारद्वाज गोत्र

**उच्च गोत्र–**

१. गोतम-गोत्र

२. मोग्गल्लान-गोत्र

३. कच्चान गोत्र व

४. वसिट्ठ-गोत्र

हस्तकला आणि शिल्पकलाही उच्च आणि निम्न श्रेणीत वाटल्या गेली होती.

**उच्च मानल्या जाणार्या शिल्प-कला आणि कर्म कौशल्य–**

१. लेखन कला

२. मुद्रण (छपाई) कला

३. हिशोब ठेवणे, मुनीम कार्य

**निम्न समजले जाणारे कर्म–**

१. बांबूच्या वस्तू बनविने

२. मातीचे माठ इत्यादी भांडे बनविने

३. वस्त्र विणणे

४. चर्म-कला (पशुंच्या चामड्यापासून जोडे इत्यादी वस्तू बनविणे

५. न्हावी कर्म (केस कापणे)

**अत्यंत हीन आणि तुच्छ समजले जाणारे कर्म**

१. मल-मूत्र उचलण्याचे काम

२. घाण, कचरा उचलून सफाई करण्याचे काम,

**उत्कृष्ट समजले जाणारे व्यवसाय**

१. कृषि

२. वाणिज्य व्यवसाय

३. गो-पालन

पाली साहित्यात खालील पाच नीच कुळ वर्णित आहेत व ह्या कुळांच्या कर्मांना हीन-कर्म मानले जात होते–

१. चांडाळ कुळ - श्मशानात शव जाळणे.

२. नेसाद कुळ - पशु-पक्षांची शिकार करणे.

३. वेनकुळ - शौच्यालय साफ करणे.

४. रथकार कुळ - मेलेल्या पशुंच्या चामड्यापासून वस्तू वनविणे.

५. पुक्कुस कुळ - कचरा उचलून सफाई करणे.

ह्याच प्रकारे खालील कर्म करणार्या व्यक्तींनाही हीन मानले जात होते.

१. नळकार - बांबूपासून टोपल्या बनविणारे.

२. कुंभकार - मातीचे माठ इत्यादी बनविणारे.

३. पेसकार - वस्त्र विनण्याचे काम करणारे.

४. चम्मकार - चामड्याच्या वस्तू बनविणारे.

५. न्हावी - केस कापण्याचे काम करणारे.

जे खूप नीच जातीचे होते, त्यांची सावलीही कोणावर पडली तर तो आपल्याला दूषित झालेला समजायचा. कधी-कधी क्रोधामुळे ज्याची छाया पडली, त्याला लोक मारित असत. ह्यामुळे अत्यंत नीच जातीचे लोक जे शहरात येत असत ते खूप जपून चालत असत की त्यांची सावलीही कोणावर पडू नये.

अश्या खराब स्थितीत बुद्धाने एक खूप क्रांतीकारी पाऊल उचलले त्यांनी नीच पेसाही नीच जाती वाल्यांनांही आपल्या संघात सामील केले. जो राज-कर्मचारीही पूजा करायचा, शेठ सावकारही पूजायचे आणि ब्राम्हणही पूजायचे. ह्या प्रकारे नीच जातींचा उद्धार करण्याचे एक खूप मोठे पाऊल भगवान बुद्धाने उचलले.

भगवान स्वतः जात-पात मानित नसत. संघात सामील झाल्यानंतर जात-पातीमुळे कोणताही भेद-भाव केला जात नसे. भिक्षूही संघात सामील झाल्यानंतर उच्च-कुळ, नीच-कुळ सर्वांजवळ भिक्षेसाठी जात असत. कधी-कधी नीच-कुळ असणार्यांना चांडाळ व वसल म्हणून बोलाविले जात असे. कोणी नवीन भिक्षू ह्या प्रकारचे संबोधन करून दुसर्यांना बोलावित असे तर तो भगवानांच्या विनयानुसार अपराध घोषित केला.

त्याच दिवसांची एक घटना आहे-प्रकृती नावाची एक षोडशी अस्पृश्य कन्या, आपल्या परिवारासाठी अस्पृश्यांच्या विहिरीतून पाणी भरित होती. दरिद्रतेमुळे मळलेले फाटके, जुने पुराणे वस्त्र घातले होते. समोरून भगवान बुध्दांचे शिष्य आनंद येत होते. आनंदही क्षत्रिय कुलोत्पन्न गौरवर्ण, प्रभावशाली व्यक्तित्वाचे धनी आणि भगवानांचे चुलत भाऊ होते. खूप गर्मीचा ऋतू होता. तहाणेने कंठ सुकलेला होता. विहिरीजवळ ह्या मुलीला पाणी भरतांना पाहून तिला पिण्यासाठी पाणी मागितले अस्पृश्य कन्या घाबरते. ही व्यक्ती भिक्षू असतांनाही स्पष्टपणे उच्च वर्णाचीच आहे. परंतु हा जाणत नाही की मी अस्पृश्य परिवाराची युवती आहे आणि ही विहीरही अस्पृश्यांची आहे. त्यामुळे ती आनंदांना सांगते की मी नीच जातीची मुलगी आहे आणि हे अस्पृश्यांचे पाणी मी एखाद्या उच्च कुळातील व्यक्तीला पिण्यासाठी देऊ शकत नाही.

आनंद त्या अस्पृश्य मुलीला म्हणतात– "ताई, मी तुला पाणी मागितले आहे, जाती विचारली नाही."

भिक्षू आनंदांच्या आग्रहामुळे संकोचित त्या अस्पृश्य कन्येने त्यांना जल दिले. प्रसन्नतापूर्वक आपली तहाण मागवून भिक्षू तेथून निघून गेले.

अचानक त्या अस्पृश्य कन्येच्या मनात विचार आला की हा उच्चजातीच्या युवापुरुष माझ्या हाताचे पाणी प्याला, तर तो मला आपली अर्धांगिनी बनविणेही अवश्य स्वीकारेल. ती घाईघाईने भिक्षू आनंदांजवळ गेली आणि आपले म्हणणे त्यांना सांगितले. भिक्षूने ते त्वरित नाकारले. ती खूप निराश झाली. तेव्हा आनंदानी त्या अस्पृश्य कन्येला सांगितले की मी जात-पातीच्या भेदभावामुळे तुझा प्रस्ताव अस्वीकार करीत नाही. परंतु आजन्म ब्रम्हचर्याचे व्रत घेतले असल्यामुळे मी असमर्थ आहे. त्यानंतर त्यांनी तिला सांगितले की आमच्या महाकारुणिक भगवान बुद्धांनी मनुष्यांना शरण दिलेली आहे. तू ही त्यांच्याजवळ जाऊन शरण घे. ज्यांना समाज हीनजातीचे मानतो. भगवान त्या सर्वांना शरण देतात. त्यांच्याजवळ जाती-जन्माचा भेदभाव नाही. त्यांच्या शरणात येऊन साधना करीत अनार्याचे आर्य बनतात. जे आज समाजात दुत्कारले जातात, लोक त्यांचाच सन्मान-सत्कार करू लागतात. तू न संकोचता भगवानांना शरण जा. तेथे अनेक साध्वी आहेत आणि माता प्रजापती तुझी उचित देखभाल करेल.

हे ऐकून अस्पृश्यकन्या प्रकृती अत्यंत प्रसन्न होऊन भगवानांना शरण आली, तिला साधना मिळाली आणि पुढे जाऊन ती साध्वी झाली.

एकदा भगवान बुद्ध आपल्या भिक्षू-संघासह मगधची राजधानी राजगिरीत धर्मचारिकेसाठी नगराच्या राजमार्गावरून जात होते. तेव्हा नगराचा भंगी सुनीत हातात झाडू घेऊन रस्ता झाडत होता. अत्यंत हीन कुळात उत्पन्न अस्पृश्य असल्यामुळे त्याच्या मनात भाव आला की माझी छायाही ह्यांच्यावर पडू नये. त्यामुळे संकोचाटे हात बांधून एका बाजूला उभा झाला. भगवानांनी त्याच्या मनाचे भाव ओळखले. निर्मम, निर्दयी समाजाच्या दूषित व्यवस्थेचा शिकार भंगी सुनीतला पाहून त्यांचे ह्दय करुणेने भरून गेले. त्यांनी त्याला आपल्याजवळ बोलाविले आणि भिक्षू-संघासोबत राजगिरीच्या वेणुवण विहारात घेऊन गेले. त्याला विपश्यना साधनेची ध्यान-विधी शिकविली. भंगी सुनीत संघात प्रव्रजित होऊन अरण्यात तप करू लागला आणि अनार्यापासून आर्य अवस्था प्राप्त करून अरहंत बनता, खर्या अर्थाने भंगीपासून ब्राम्हण बनला.

ह्याच प्रकारे चांडाळ कुळात जन्मलेला एक बालक सोपाक जेव्हा चार वर्षाचा झाला तेव्हा अनाथ झाला. गरीबीमुळे भार समजून सात वर्षाच्या अवस्थेत त्याच्या काकाने त्याच्यावर क्रोधित होऊन स्मशानात एका शकासोबत त्याला पक्के बांधले ज्यामुळे जंगली पशू त्याला चिरून-फाडून खातील. महाकारुणिक भगवानांनी ही घटना पाहिली तेव्हा एका भिक्षूला पाठवून सोपाकला सोडविले व विहारात आणविले. तेथेच त्याची प्रव्रज्या आणि उपसंपदा झाली. पुढे जाऊन चांडाळाच्या घरी जन्मलेला सोपाक साधनेत करून अरहंत झाला.

इतिहासात एक अजून फार मोठे पाऊल डॉ. बाबासाहेब आंबडेकरांनी उचलेले, जेव्हा त्यांनी असे संविधान रचले ज्याच्यात उच्च-नीचला कोणतेही स्थानच नाही. मनुष्य, मनुष्य आहे. त्यांनी नीच जाती मानल्या जाणार्या लोकांना शिकण्याची सुविधा दिली. उच्चातील उच्च अभ्यास करून नीच जातीचे लोक सरकारमध्ये सेक्रेटरी सुद्धा बनले. आता त्यांना कोण नीच म्हणेल? ह्या प्रकारे उच्च नीचच्या भेद-भावाला तोडण्याचे खूप मोठे काम डॉ बाबासाहेब आंबडेकरांनी केले.

परंतु तरीही गावात आजपर्यंत जात-पात, उच्च-नीच, आणि शिवाशीवची प्रथा काही मात्रेत कायमच आहे. तो दूर झाली नाही.

मला आठवते, बर्मा (म्यंमा) त राहात असतांना अश्या कट्टर सनातनी घरात जन्मलो आणि वाढलो. तेथे पाहिले की भंगी आणि चांभारच नाही तर नीच जाती म्हणविणारे अनेक लोक असे होते, ज्यांचे स्पर्शलेले आम्ही पिऊ शकत नव्हतो. बाबासाहेबांनी यात खूप मोठी सुधारणा घडविली. तरीही समाजात नीच कुळ असणारे नीचच

मानले गेले आणि उच्च कुळातील उच्चच मानले गेले.

जशी मोठी क्रांती भगवान बुद्धांने नीच जातींना संघात सामावून केलृ, तशीच बाबासाहेबांनी शिक्षणाचा प्रसार करून त्यांना सन्मानित केले. तरीही देशाचे हे दुर्दैव पूर्णपणे समाप्त झाले नाही.

आता विपश्यनेने एक पाऊल अजून समोर वाढविले आहे. त्याच्या शिबिरात सर्व जातीचे लोक सामील होतात. न कोणी नीच, न कोणी उच्च सर्व बरोबरीने सोबत राहून साधना करतात. सर्व सोबत बसून भोजन करतात, सोबत राहातात. आता तर स्थिती इथपर्यंत आली आहे ई मोठ्या संख्येने दलित म्हणविणार्यांना विपश्यनेत पुढे प्रशिक्षित करून आचार्य पदावर स्थापित केले गेले आहे. आता एक दलित वर्गाची व्यक्ती जेव्हा आचार्य-आसनावर बसते तेव्हा ती दलित नाही तर धर्माची शिक्षक आहे. जे साधनेत सामील होतात. ते सर्व जरी ब्राम्हण असोत, क्षत्रिय असोत अथवा वैश्य असोत, सर्व विपश्यनेच्या त्या आचार्यासमोर शिर नमवितात, नमन करतात आणि त्याच्याकडून धर्म शिकतात. भगवानांच्या विद्येत जात-पातीचा भेदभाव नाही, विपश्यना विद्या व आचरणच प्रमुख आहे, जी सर्वांना उपलब्ध आहे. आपसातील भेद-भावांना तोडण्याचे एक महत्वपूर्ण कार्य विपश्यना करीत आहे. पाहुया, याचा किती प्रभाव सार्या समाजावर होतो. समाजाचे आणि देशाचे हे दुर्दैव दूर होईल, तेव्हाच मंगल होईल! तेव्हाच कल्याण होईल!!

कल्याणमित्र,
सत्यनारायण गोयन्का

## आवश्यकता है पगोडा पर सुयोग्य मार्ग-दर्शकों की

पगोडा पाहायला येणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यांना योग्यरीत्या समजाविणे दाखविणे इत्यादींसाठी खूपच मृदुभाषी, सुभाषी, समजविण्यात निपुण सुयोग्य मार्गदर्शकांची मोठ्या संख्येने आवश्यकता आहे, साधकांने कृपया स्वतःबाबत स्वतः तपासून पूर्ण विवरणासहित खालील ईमेल अथवा फोनवर त्वरित संपर्क साधावा. येण्या-जाणाऱ्या खर्च, भोजन, विश्राम, सेवा आणि ध्यान-भावनेचा लाभ मिळेल. फोन : ०२२-२८४५१२०४, (९१) २२-३३७४७५०१ (३० लाइन्स), ईमेल pr@globalpagoda.org

---

## ग्लोबल पगोडा में (परियत्ति और पटिपत्ति) पालि अभ्यासक्रम - २०१३

**आवासीय अभ्यासक्रमः— ९० दिवसीयः पालि-इंग्रजी; अवधी -** ०१-०७-२०१३ ते ३०-०९-२०१३ पर्यंत; आवेदन पत्र जमा करण्याची अंतिम तारीख - १५-०५-२०१३; **सर्वांसाठी कंप्यूटर वर आवेदन पत्र —** www.vridhamma.org ने ही पाठवू शकतात. **संपर्कः** विपश्यना विशोधन विन्यास (V. R. I.), ग्लोबल विपश्यना पगोडा, एस्सेल वल्डच्या जवळ, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९१.

**फरवरी की पत्रिका। में भी अनुवाद नहीं मिला**

**अधिक जानकारी के लिए संपर्क करें—** १). डॉ शारदा संघवी – फोनः ०२२- २३०९५४१३, मो. ०९२२३४६२८०५, **ईमेलः** s_sanghvi@hotmail.com; २) श्रीमती बलजीत लाम्बा : फोनः ०९८३३५१८९७९; ३) अलका वेंगुलकरः मो.– ०९८२०५८३४४०.

### अतिरिक्त उत्तरदायित्त्व

#### आचार्य

1. U Myat Kyaw, To serve as Centre Teacher for Dhamma Mandala, Mandalay, and co-ordinator for jail courses in Myanmar.
2. Daw Saw Mya Yee, To serve as children course co-ordinator in Myanmar
3-4. Dr. Khin Maung Aye & Dr. Daw Kyi Sein, UK, To conduct courses in Prisons, (Except in Myanmar)

#### वरिष्ठ सहायक आचार्य

१. श्री सुदर्शन ग्रोवर, ठाणे, धम्मगिरिच्या केंद्र आचार्यची सहायता

#### सहायक आचार्य

१. श्री नवीनचंद्र मेहता, डोंबीवली, धम्मगिरिच्या केंद्र आचार्यची सहायता

### नये उत्तरदायित्त्व

#### वरिष्ठ सहायक आचार्य

१. श्री दिलीप काटे, सोलापुर
२. श्री महावीर प्रसाद जैन, अमरावती
३. श्री माणिक चिकाटे, चंद्रपुर
४. श्री बाबूराव ठाकरे, नागपुर
५. श्री प्रेम नारायण शर्मा, नागपुर
६. श्रीमती पुष्पलता कोलते, चंद्रपुर
७. श्री कौशलेंद्र प्रताप सिंह, दिल्ली
८. डॉ. सुभाष सेठी, गुड़गांव
९. श्रीमती जस मदान, फरीदाबाद
१०. श्री राजेंद्र प्रसाद, नई दिल्ली
११. श्री कौशलकुमार भारद्वाज, दिल्ली
१२. श्री गुनीतसिंह लेहल, नई दिल्ली
१३. श्री अशोक आर. बाभले, मुंबई
14. Mr. Itai Brauer, Israel
15. Mr. Norman Faulkner, Canada

### नव नियुक्तियां

#### सहायक आचार्य

१. श्री केवल चंद जैन, हैदराबाद
२. श्री अनिल जरीवाला, सूरत
३. श्री प्रह्लाद गजबे, नागपुर
४. श्रीमती उज्ज्वला अड्डिगा, सिकंदराबाद
५. श्री विजयकुमार खन्ना, लखनऊ
६. श्रीमती कुमुद शाह, मुंबई
७. श्रीमती दमयंती बोदाना, मुंबई
८. कु. पूर्णिमा शाह, अंकलेश्वर
९. श्री श्रीधर वानखेडे, अकोला
१०. श्री सुहास कांबले, पुणे
११. श्रीमती शशिप्रभा गर्ग, बरनाला
१२. श्री एन.आर. मधुकर, बीरमगुडा
१३. श्री वामन बैंगाने, नागपुर
१४. श्री बिजय बहादुर राजभंडारी, नेपाल
१५. श्री गोपालदास महर्जन, नेपाल
१६. श्री शंकरराज शाक्य, नेपाल
१७. श्री सुरेश लाल श्रेष्ठ, नेपाल
१८. श्रीमती शर्मिष्ठा उदास, नेपाळ
१९. अनागारिका सोना, नेपाळ
२०. श्रीमती विद्या शाक्य, नेपाळ
२१. कु. सबिता बज्राचार्य, नेपाळ
२२. कु. फूल डंगोल, नेपाळ
२३. श्री खड्ग बहादुर कर्की, नेपाळ
२४. टिकाराम उपाधाय, नेपाळ
25. Mrs. Karen Chapman, UK
26. Ms. Anneke Kruijer, the Netherlands
27. Mrs. Derbhail Ryan, Ireland
28. Ms. Siu Lan Eva Kwok, Hong Kong
29. Mrs. Chandini Dharmakirti, Australia
30. Ms. Marguerite Kiss, France
31. Mr. Chaiwat Limchitti, Thailand

#### बाल-शिविर शिक्षक

१. श्रीमती वंदना पारख, दिल्ली
२. श्री अनिल करांदे, कोल्हापुर
३. श्री अमोल मिठारी, कोल्हापुर
४. श्री सचिन पोवार, इचलकरंजी
५. श्री शंभाजी मोहिते, कोल्हापुर
६. श्री नागेश स्वामी, सतारा
७. श्री विजय लांडगे, सांगली
८-९. श्री रवींद्र एवं श्रीमती सुनीता मेश्राम, रतनागिरि
१०. डॉ. श्रीमती किरन अमीन, जबलपुर
११. डॉ. गुलशनराय माकन, जबलपुर
१२. श्रीमती नीना कपूर, पटना
13. Mr Mg Thiha, Myanmar
14. Ms. Ma Su Thet, Mon, Myanmar
15. Ms Daw Nan Kyu Aye, Myanmar
16. Mr Mg Kyaw Kyaw Naing, Myanmar
17. Ms Daw Moh Moh Kyi, Myanmar
18. Ms Daw Than Than Hyein, Myanmar
19. Mrs Ma Myat Thin Su, Myanmar
20. Mrs. Chui Mei Wee, Singapore
21. Mr Mein Chow Seow, Singapore
22. Ms. Chwe keng Tan, Malaysia
23. Mr Happy Choo Kai-Meng, Malaysia
24. Ms. Komala Thavi, Malaysia
25. Ms. Beng Kim Beh, Malaysia
26. Mr. S Pathmanathan, Malaysia
27. Mr. Christopher Marquardt, USA
28. Mrs. Oom Marquardt, USA
29. Mrs. Anh Huynh, USA
30. Mr. Rafael Caudros, USA
31. Ms.Vikky McArthur, USA
32. Mr. Thomas Hicks, Canada
33. Mr Tom Wolfe, UK
34. Mr Nicholas Potter, UK
35. Mr Tom Pope, UK

### मंगल मृत्यु

घाटकोपर (मुंबई) चे श्री नटवरलाल दलाल मागील ७ जानेवारीला हृदयगती थांबल्यामुळे दिवंगत झाले. त्यांनी १९९७ पासून सहायक आचार्याच्या रूपाने साधकांची खूप सेवा केली. इतर प्रकारेही धर्मसेवा देत राहिले. दिवंगतास शांतीलाभ प्राप्त हो.

ह्याच प्रकारे घाटकोपर (मुंबई) चेच शी प्रवीणचंद्र देसाई २००७ पासून सहायक आचार्याच्या रूपाने सेवा देत होते. काही कालावधीपासून ते आपल्या गावी राजकोट येथे राहात होते आणि तेथील केंद्र धम्मकोट येथे त्यांनी अनेक शिबिरांचे संचालन केले. हृदयरोगामुळे त्यांचा मृत्यू झाला परंतु ह्याची सूचना आम्हाला खूप उशीला प्राप्त झाली. धर्मसेवेच्या फळस्वरूपाने दिवंगतास शांतिलाभ प्राप्त होवो.

कोटा (राजस्थान) चे श्री बालचंद पोद्दार म्यंमामध्ये पूज्य गुरुदेवांचे लहाणपणाचे सवंगडी होते आणि पूज्य गुरुदेव सयाजी ऊ बा खिनपासून ते साधनाही शिकले होते. भारतात येऊन व्यापार धंद्यात लागले. विपश्यना जेव्हा भारतात परतली तेव्हा येथील शिबिरातही सामील झाले. त्याच्या पूर्ण परिवार १९७० च्या दशकापासूनच व निर्माण कार्यात सहकार्य करीत राहिला. गेल्या फेब्रुवारीला त्यांनी शांतिपूर्वक शेवटचा श्वास घेतला. आपल्या पुण्य पारिमितांच्या फळस्वरूप तेही शांतिलाभी झाले.

---

### दोन दिवसीय निवासीय बाल-शिबिर

धम्मवाहिनी टिटवाला विपश्यना केंद्रावर १२ ते १५ वर्षाच्या मुलं मुलीं करीता दोन दिवसीय निवासीय शिबिर आयोजित करण्यात येत आहेत. साधकांनी कृपरा खालील तारीख व बुकिंगची वेळ पाहून, योग्य वेळी मुला/मुलींसाठी बुकिंग (रजिस्ट्रेशन) अवश्य करावे.

(१) येत्या २६ व २७ मेला केवळ मुलांसाठी, बुकिंग १५ मे नंतर, फोन नं. ०२२-२५१६२५०५/२५०११०९६ वर ऑफीस वेळात संपर्क करावा

.(२) ह्याच प्रकारे ६ व ७ जनुला, केवळ मुलींसाठी, बुकिंग २५ में नंतर, फोन नं ०२२-२५१६२५०५/२५०११०९६ वर ऑफीस वेळात संपर्क करावा.

---

### किशोर-किशोरियों (१५ से १९ वर्ष) के ८ दिवसीय शिविर

### अनुवाद नहीं मिला

---

### बौद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने पूज्य गुरुदेवांच्या सान्निध्यात एक दिवसीय महाशिबिर

**२५ मे, २०१३ शनिवार**, वेळ - सकाळी 11 बाजेपासून दुपारी ४ वाजेपर्यंत, **'ग्लोबल विपश्यना पगोडा' च्या** मोठ्या धम्मकक्षा (डोम) मध्ये. कृपया लक्ष द्यावे की ह्या विशाल शिबिरात आपल्याला कोणत्याही प्रकारची असुविधा होऊ नये यासाठी **बुकिंग केल्याविना येऊ नये. बुकिंग संपर्कः मो. फोन नं.ः** ०२२-२८४५११७०, ३३७४७५४३/३३७४७५४४, (**फोन बुकिंगः** सकाळी ११ ते ५ पर्यंत, रोज) **ईमेल Registration:** oneday@globalpagoda.org;
**Online Registration:** www.vridhamma.org

---

### दोहे धर्माचे

जाती वर्ण गोत्राचा, चढे शिरी अभिमान।
शुद्ध धर्माला सोडून, भटकलाच नादान॥

जेथे जाती वर्णाचा, गोत्राचा हो माज।
धर्म न टिकू शके तिथे, अहंकाराचे राज॥

जेव्हा मनुष्य समाजी, जाती वाढे जाण।
तेव्हा मंगल धर्माचे, सुमन सर्व हो म्लान॥

शुद्ध धर्म जगी जागो, तर होय सर्व सुखी।
संप्रदाय प्रमुख हो, तर होय सर्व दुखी॥

वाढे धर्म नावाने, संप्रदाय जोरात।
जन जन मन व्याकुळ होय, दुःख पसरे जगात॥

### दोहे धर्माचे

जात पातीचे बावळट, माथी भूत आहे।
सत्य धर्म जर सुटलाच, शिवाशीवच राहे॥

जाती पातीचा वर्णाचा, चढला गर्व गुमान।
मूढ होताच धर्माचे, न उरे नावनिशान॥

पडली भांग मोहाची, सर्व विहिरी समान।
संप्रदाय मदिरेने, सर्वच बिघडे जाण॥

स्व मताची मान्यताच, करी नष्ट मति कर्म।
संप्रदायाची सुरा, समजू ना दे धर्म॥

जात पातिची विषमता, उच्च निच भेद आहे।
सम्यक धर्मच जर सुटे, नावी छिद्र राहे॥

सम्प्रदाय प्रिय वाटे, धर्म न धारती जन।
सम्प्रदायात सुख कुढे? सुख करून धर्म धारण॥

विपश्यना विशोधन विन्यास
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (02553) 244076, 244086, 243712, 243238. **फैक्स :** (02553) 244176
**Email:** info@giri.dhamma.org
**Website:** www.vridhamma.org